# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## अधिसभेच्या दुसऱ्या सभेचा कार्यवृत्तांत
## रविवार, दि.०३ एप्रिल, २०११ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची दुसरी सभा दि.०३ एप्रिल, २०११ रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहात मा. प्रभारी कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

परिनियम ४७६ (२) नुसार, गणपूर्ती अभावी सभा तहकूब करण्यात आली व पंधरा मिनिटांनतर पुन्हा दुपारी १२:१५ वाजता सुरु करण्यात आली.

सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन, प्रभारी कुलगुरु तथा संचालक म. व वि.वि.मं. | अध्यक्ष |
| २) | डॉ. नवले एस. एम. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. हलकुडे एस. ए. | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. कोळेकर सी. बी. | सदस्य |
| ८) | प्राचार्य श्री. पाटील आर. वाय. | सदस्य |
| ९) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. पुजारी ए. जी. | सदस्य |
| ११) | प्राचार्य डॉ. शिंदे डी. के. | सदस्य |
| १२) | श्री. डोंगरे एम. एस. | सदस्य |
| १३) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १४) | श्री. रोंगे बी. पी. | सदस्य |
| १५) | श्रीमती कुरापाटी एस. बी. | सदस्य |
| १६) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. | सचिव |
| १७) | डॉ. बिराजदार बी. एस. | सदस्य |
| १८) | डॉ. इंगोले के. जे. | सदस्य |
| १९) | डॉ. कोळेकर टी. एन. | सदस्य |
| २०) | डॉ. चव्हाण सी. एस. | सदस्य |
| २१) | डॉ. भोसले यु. व्ही. | सदस्य |
| २२) | डॉ. बाड डी. आर. | सदस्य |
| २३) | डॉ. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| २४) | डॉ. बचुटे एम. टी. | सदस्य |
| २५) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| २६) | डॉ. बारबोले ए. एन. | सदस्य |
| २७) | डॉ. भिलेगावकर एस. डी. | सदस्य |
| २८) | डॉ. श्रीमती दळवी आर. जे. | सदस्या |

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| २९) | डॉ. गेंगजे एस. आर. | सदस्य |
| ३०) | डॉ. काशीद एस. एस. | सदस्य |
| ३१) | श्रीमती डॉ. आपटे एस. एस. | सदस्या |
| ३२) | श्रीमती डॉ. याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ३३) | श्रीमती डॉ. रणनवरे जे. डी. | सदस्या |
| ३४) | डॉ. शिंदे एस. व्ही. | सदस्य |
| ३५) | श्री. गायकवाड आर. एस. | सदस्य |
| ३६) | श्री. देशपांडे ए. व्ही. | सदस्य |
| ३७) | श्री. गायकवाड एस. पी. | सदस्य |
| ३८) | श्री. शिंदे आर. बी. | सदस्य |
| ३९) | श्री. कोकरे एम. बी. | सदस्य |
| ४०) | श्रीमती विभूते एस. बी. | सदस्या |
| ४१) | श्री. व्हनकळस डी. डी. | सदस्य |
| ४२) | श्रीमती जमादार एम. पी. | सदस्या |
| ४३) | श्री. चौगुले एस. एस. | सदस्य |
| ४४) | श्री. जमादार के. एम. | सदस्य |
| ४५) | श्री. शेळके बी. बी. | सदस्य |
| ४६) | श्रीमती पाटील एस. एन. | सदस्या |
| ४७) | श्री. रुपनर बी. ए. | सदस्य |
| ४८) | श्री. वाघमोडे एस. एम. | सदस्य |
| ४९) | श्री. रिसबूड एस. एच. | सदस्य |
| ५०) | डॉ. भोसले आर. बी. | सदस्य |
| ५१) | डॉ. पाटील आर. आर. | सदस्य |
| ५२) | डॉ. पवार एन. बी. | सदस्य |
| ५३) | डॉ. निंबाळकर व्ही. एच. | सदस्य |
| ५४) | डॉ. जोशी पी. बी. | सदस्य |
| ५५) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ५६) | श्री. कदम एल. एस. | सदस्य |
| ५७) | श्री. कांबळे एन. आर. | सदस्य |
| ५८) | श्री. घागरे एम. व्ही. | सदस्य |
| ५९) | डॉ. नारायणपेठकर ए. बी. | सदस्य |
| ६०) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६१) | डॉ. गवळी आर. एस. | सदस्य |
| ६२) | श्री. देशमुख एस. ए. | सदस्य |
| ६३) | श्री. निकंबे व्ही. एस. | सदस्य |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**<u>अनुपस्थिती :</u>**

प्राचार्य डॉ. देशमुख ए. एल. व डॉ. गांधी आर. एच. यांनी पत्राद्वारे, मा. आमदार कु. प्रणिती शिंदे, डॉ. कदम बी. बी. व ॲड. सलगर बी. एस. यांनी दूरध्वनीद्वारे तसेच डॉ. वडगावकर पी. पी. यांनी ईमेलद्वारे या सभेस अनुपस्थित रहाण्यासंबंधी कळविले होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

सभेच्या सुरुवातीला डॉ. बारबोले ए. एन. यांनी पुढीलप्रमाणे स्थगन प्रस्ताव मांडला.

"सोलापूर विद्यापीठाची दुसरी अधिसभेची बैठक आज रविवार दि.०३/०४/२०११ रोजी होत आहे. आम्ही अधिसभा सदस्य या सभेस स्थगन प्रस्ताव देत आहोत. सोलापूर विद्यापीठाने अधिसभा बैठकीची तारीख चाळीस दिवस अगोदर निश्चित केली असून सदस्यांना कळविले जाते. त्यामुळे या बैठकीस उपस्थित रहाण्याचे नियोजन केले जाते. अधिसभेची बैठक घेताना कार्यालयीन वेळेत घेणे आवश्यक आहे. सदरची बैठक रविवारी म्हणजे साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी होत आहे. सुट्टीच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी असल्याने महत्वाची माहिती सदस्यांना हवी असल्यास मिळण्याची शक्यता कमी आहे. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाच्या अधिसभेच्या बैठका ३१ मार्च पूर्वी झालेल्या आहेत. कारण ३१ मार्च पूर्वी अंदाजपत्रक मंजूर करणे आवश्यक होते. काही आमदारांच्या विनंतीनुसार अधिसभेची बैठक पुढे ढकलते म्हणजे इतर अधिसभा सदस्यांना गैरसोयीचे करणे योग्य नाही. प्रा.एन. बी. पवार यांच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी प्राचार्याची चौकशी करण्यासांबंधीचा एक ठराव व्यवस्थापन परिषदेस शिफारस करणारा असा ठराव वगळण्यात आलेला आहे. त्यामुळे या सर्व कारणांमुळे आम्ही सर्व अधिसभा सदस्य ही सभा स्थगित करावी असा स्थगन प्रस्ताव देत आहोत याचा स्वीकार व्हावा ही नम्र विनंती. जो ठराव करण्यात आला तो विषय काय महत्वाचा नाही तर त्याला आयत्या वेळेच्या विषयामध्ये तरतूद करुन घेणे आणि तो कायदेशीर व नियमात बसणारा ठराव असल्यामुळे ही अधिसभा पुढे ढकलण्यात यावी अशा प्रकारचा स्थगन प्रस्ताव मी सभेपुढे ठेवत आहे."

असा प्रस्ताव सादर केला व तो सभागृहापुढे मांडला.

मा. अध्यक्षानी या स्थगन प्रस्तावाबाबत कुलसचिव यांना निवेदन देण्यास सांगितले. ते खालीलप्रमाणे:

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २५ (३) नुसार, महामहीम कुलपती अधिसभेचे अध्यक्ष आहेत. महामहीम कुलपतीमहोदयांच्या सचिवांचा मा.कुलगुरुमहोदयांना सदरची सभा पुढे ढकलण्याबाबत दूरध्वनीसंदेश आला. विधीमंडळाचे अधिवेशन चालू असताना अधिसभेची सभा शक्यतो सुट्टीच्या दिवशी घ्यावी असे महामहीम कुलपतीमहोदयांच्या सचिवांनी सूचित केल्याने दि.२९/०३/२०११ रोजीची सभा रविवार दि.०३/०४/२०११ रोजी घेण्यात येणार असल्याचे सर्व अधिसभा सदस्यांना महामहीम कुलपतीमहोदयांच्या मान्यतेअन्वये कळविण्यात आले आहे."

मा. अध्यक्षांनी डॉ. बारबोले ए. एन. यांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळला. यानंतर डॉ. बारबोले यांनी पुन्हा डॉ. एन. बी. पवार यांनी दिलेल्या ठरावाचा समावेश कामकाजपत्रकामध्ये केला नसल्याचे सांगितले यावर मा.अध्यक्षांनी ०२ वेगवेगळे विषय म्हणजे डॉ. पवार एन. बी. यांनी दिलेला ठराव वैयक्तिक स्वरुपाचा आहे. व डॉ. काशीद यांनी मागणी केलेली डॉ. पवार एन. बी. व श्री. रोंगे बी. पी. यांच्याबाबतीतील माहिती ही माहितीच्या स्वरुपाची असल्याने या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही नियमानुसार असल्याचे सांगितले व डॉ. बारबोले यांचा स्थगन प्रस्ताव फेटाळल्याचे जाहीर केले. यावर डॉ. बारबोले ए. एन. यांनी व्यक्तिशः निषेध व्यक्त केला.

कुलसचिवांनी मा. प्रभारी कुलगुरुंना पहिली अधिसभा व दुसरी अधिसभा बैठक या दरम्यानच्या कालावधीतील प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. प्रभारी कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

- वर्ग १ व २ संवर्गामधील चार रिक्त पदे सरळ सेवेने भरण्याबाबतची जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
- विद्यापीठाचा सहावा दीक्षांत समारंभ दि.०८ जानेवारी, २०११ रोजी संपन्न झाला. प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. वेद प्रकाश हे उपस्थित होते.
- दि. २४ व २५ जानेवारी, २०११ रोजी विविध १२ विषयांसाठी सेट/नेट परीक्षा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरामध्ये विद्यापीठ व विद्यापीठाबाहेरील एकूण ३० विषयतज्ञानी मार्गदर्शन केले.
- प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दि.२६ जानेवारी, २०११ रोजी "शिवचरित्रापासून आपण काय शिकावे" या विषयावर डॉ. शिवरत्न शेटे यांचे व्याख्यान संपन्न झाले.
- दि.३१ जानेवारी, २०११ रोजी शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज येथे युवानेतृत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- विद्यापीठाच्या ४८२ एकर जागेमध्ये संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत दि.२०/११/२०१० ते दि.१९/०२/२०११ पर्यंत श्रमसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीरामध्ये एकूण ५० महाविद्यालयातून ४२५० विद्यार्थी सहभागी झाले होते.
- राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीर दि.२०/२/२०११ ते २६/२/२०११ अखेर संपन्न झाले.
- आरोग्य केंद्रामार्फत राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातील एकूण ६०० विद्यार्थ्यांची रक्त तपासणी करण्यात आली.
- दि.९/३/२०११ रोजी समाजशास्त्र संकूलात आयोजित केलेल्या "करिअर गाईडन्स सेलचे" उद्‌घाटन जिल्हाधिकारी मा. डॉ. जगदीश पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले.

- इन्स्ट्रूमेंटेशन सेंटरकरीता लागणाऱ्या उपकरणासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.
- सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा कोंडी येथे असलेल्या विद्यापीठाच्या चारही खात्यास नेटबँकिंग सुविधा उपलब्ध झाली. त्यानुसार ई-पेमेंट सुविधेचा फायदा विद्यापीठास झाला.
- महामहीम कुलपती कार्यालयामार्फत "आव्हान २०११" हा राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापनाचा प्रशिक्षण कार्यक्रम दि.६ ते १५ जून २०११ दरम्यान विद्यापीठात आयोजित करण्यात येत आहे. त्याबाबतची बैठक महामहीम कुलपतींचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४ मार्च, २०११ रोजी पार पडली.

सदर सभेत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

[ १ ] अधिसभेच्या दि.२४ डिसेंबर, २०१० रोजी झालेल्या पहिल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो/सनिवि/अधिसभा/९१०१, दि.२१ जानेवारी, २०११ अन्वये, दि.२४ डिसेंबर, २०१० रोजी झालेल्या पहिल्या सभेचा कार्यवृत्तांत पाठवून देण्यात आला आहे. कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२१/०२/२०११ होती. या कालावधीत कोणत्याही दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत. सबब, कार्यवृत्तांत कायम करण्याबाबत विचारार्थ).

**ठराव: अधिसभेच्या दि.२४ डिसेंबर २०१० रोजी झालेल्या पहिल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

[ २ ] अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यांना दिली जाणारी उत्तरे तसेच पूरक प्रश्न व त्यांना द्यावयाची उत्तरे, परिनियम ४७६(८) च्या तरतूदीमधील विनिर्दिष्टप्रमाणे अधिसभा सदस्यांना अन्य सदस्याने विचारलेल्या प्रश्नास दोन पूरक प्रश्न विचारता येतील.
(टिपणी: परिनियमानुसार प्रश्न आणि त्यांना व्यवस्थापन परिषदेने तयार केलेल्या उत्तराचे विवरणपत्र परिनियम क्र. ४७६(७) अन्वये पाठविण्यात येतील).

**ठराव:**

**१) प्रश्नोत्तराचा तास दुपारी १२:२७ वाजता सुरु झाला व दुपारी १:२७ वाजता संपला.**

**२) प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विचारलेले प्रश्न, उपप्रश्न व त्यावर देण्यात आलेली उत्तरे याची प्रत सोबत जोडली आहे (जोडपत्र "अ")**

**३) प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्न क्र. १ ते १२ व त्यावर सदस्यांनी विचारलेल्या उपप्रश्नांची उत्तरे देण्यात आली.**

[ ३ ] सन २००९-१० च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.

डॉ. ए. बी. सूर्यवंशी यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी: वित्त व लेखा समितीच्या दि.२४/०२/२०११ रोजी झालेल्या सभेत सन २००९-१० चा लेखापरीक्षण अहवाल स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला आहे. महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २८ (२) (सीसी) नुसार, व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०२/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र.१८ अन्वये लेखापरीक्षण अहवालावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

"सन २००९-२०१० च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात आली व अधिसभेस हा लेखापरीक्षण अहवाल मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. "

सबब, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २६ (२) नुसार सन २००९-१० च्या लेखापरीक्षण अहवालाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ).

**ठराव: सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर व त्यास अनुमोदन दिल्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) श्री. एस. एच. रिसबूड**
**२) प्राचार्य डॉ. के. एन. गणगे**
**३) डॉ. ए. एन. बारबोले**
**४) श्री. के. एम. जमादार**
**५) प्राचार्य डॉ. ए. जी. पुजारी**
**६) डॉ. एन. बी. पवार**
**७) श्री. बी. पी. रोंगे**
**८) डॉ. सी. एस. चव्हाण**
**९) डॉ. पी. बी. जोशी**
**१०) श्री. बी. आर. गायकवाड**

**तसेच वित्त व लेखा अधिकारी यांनी प्रशासकीय निवेदन केले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. सूर्यवंशी ए. बी. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ४ ] सन २०१०-११ च्या सुधारीत अंदाजपत्रक व सन २०११-१२ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेची शिफारस विचारार्थ.

प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात याव्यात."

(टिपणी:- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (ई) व (१०१) नुसार वित्त व लेखा अधिकारी यांनी तयार केलेले विद्यापीठाचे सन २०१०-११ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०११-१२ चे मूळ अंदाजपत्रक दि.१५/०२/२०११ च्या वित्त व लेखा समितीसमोर सादर करण्यात आले. त्यास वित्त व लेखा समितीने दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली होती. व्यवस्थापन परिषदेच्या दि.२८/०२/२०११ रोजीच्या सभेत विषय क्र. १५ वरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

"सन २०१०-११ च्या सुधारीत अंदाजपत्रक व सन २०११-१२ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात आली व अधिसभेस मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली. "

सबब, सन २०१०-११ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०११-१२ चे मूळ अंदाजपत्रकाबाबत महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम २६ (२) नुसार व्यवस्थापन परिषदेची शिफारस अधिसभेच्या विचारार्थ).

**ठरावः सदरचा प्रस्ताव प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. यांनी खालील टंकलेखनीय दुरुस्तीसह सभागृहासमोर मांडला.**

**१) अंदाजपत्रक पान क्र. ५ वर अ.क्र. ५ d) Merit Scholarship (above ८०%) मध्ये १०,००,०००/- ऐवजी १,००,०००/- अशी दुरुस्ती करावी.**

**२) अंदाजपत्रक पान क्र. ०७ वर, १३ q) मध्ये Asso. of Common Wealth Uni. ऐवजी Asso. of Indian Universities अशी दुरुस्ती करावी.**

**३) अंदाजपत्रक पान क्र. ३० वर, अ.क्र. २ मध्ये, Withdrawal from University Fund हे शब्द वगळण्यात यावे.**

**सदर प्रस्तावास अनुमोदन दिल्यानंतर खालील अधिसभा सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले.**

**१) श्री. बी. पी. रोंगे**
**२) प्राचार्य डॉ. के. एन. गणगे**
**३) डॉ. पी. बी. जोशी**
**४) श्री. एस. एच. रिसबूड**
**५) डॉ. एम. टी. बचुटे**

**त्यानंतर सदर प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ५ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. पवार एन. बी. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठात Indian Languages व English and Foreign Languages हे दोन वेगवेगळे पदव्यूत्तर विभाग सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कोळेकर टी. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. भोसले यु. व्ही. यांनी खालील ठराव मांडला व यास डॉ. बाड डी. आर. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठात स्कूल ऑफ सोशल सायन्स विभागात इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र हे पदव्यूत्तर विषय अनुदानित सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ७ ] अधिसभा सदस्य डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्रीमती विभूते एस. बी. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठात वाणिज्य व व्यवस्थापन हा पदव्यूत्तर विभाग अनुदानीत तत्वावर सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ ८ ] अधिसभा सदस्य डॉ. इंगोले के. जे. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. बिराजदार बी. एस. यांनी अनुमोदन दिले.

सत्रपरीक्षेसाठी प्राश्निकांनी प्रश्नपत्रिका काढण्यासाठीचे मानधन, प्रवास व दैनंदिन भत्ता नव्याने निश्‍चित करण्यात यावा अशी शिफारस ही सभा परीक्षा मंडळास करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ९ ] अधिसभा सदस्य डॉ. इंगोले के. जे. यांनी खालील ठराव मांडला व त्यास श्री. गायकवाड आर. एस. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठातील सर्व महाविद्यालयातील ग्रंथालये संगणिकरण करुन ती ऑनलाईनने विद्यापीठाच्या मुख्य ग्रंथालयास जोडण्यात यावीत अशी शिफारस ही सभा ग्रंथालय समितीस करीत आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. इंगोले के. जे. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ १० ] अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. पुजारी ए. जी. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठाने ऑनलाईन बँकिंग सुविधा उपलब्ध करावी अशी शिफारस ही सभा वित्त व लेखा समितीस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ ११ ] अधिसभा सदस्य श्री. कांबळे एन. आर. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. इंगोले के. जे. यांनी अनुमोदन दिले.

विद्यापीठाने शै. व. सन २०१०-११ पासून सत्र परीक्षा पध्दती स्वीकारली असल्यामूळे परीक्षा फॉर्म भरुन घेण्याचे काम कीचकट व वाढलेले आहे. याचा विचार करुन परीक्षा फॉर्म भरुन घेण्यासाठी महाविद्यालयाला परीपत्रक मिळाल्यापासून नियमित शुल्काने फॉर्म स्वीकारण्यासाठी - २१ दिवस, विलंभ शुल्काने- १५ दिवस, अती विलंभ शुल्काने- १० दिवस अशी वेळ देण्यात यावी म्हणून ही अधिसभा परीक्षा मंडळाकडे शिफारस करीत आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

[ १२ ] अधिसभा सदस्य डॉ. कोळेकर टी. एन. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. शिंदे एस. व्ही. अनुमोदन दिले.

Ph.D. प्रवेश परीक्षा (PET) याच्यामध्ये पास होण्यासाठी किमान ५०% मार्कस् असावेत. ५०% पेक्षा कमी मार्कस् असतील तर Ph.D. कोर्ससाठी प्रवेश देण्यात येवू नये अशी शिफारस ही अधिसभा महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडे करित आहे.

**सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास अनुमोदन दिल्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. कोळेकर टी. एन. यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.**

[ १३ ] अधिसभा सदस्य डॉ. शिंदे एस. व्ही. यांनी खालील ठराव मांडला व त्यास डॉ. कोळेकर टी. एन. यांनी अनुमोदन दिले.

सोलापूर विद्यापीठातील Ph.D. प्रवेश पुर्व परिक्षेचा (PET) निकाल, प्रश्नपत्रीका व त्याची उत्तर पत्रीका निकाल लागल्यापासून चार दिवसाच्या आत विद्यापीठाच्या वेबसाइटवर देण्यात यावेत अशी शिफारस ही अधिसभा परिक्षामंडळास करित आहे.

**सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

मराठी नववर्षारंभाच्या अधिसभेच्या सर्व सदस्यांना प्रशासनातर्फे शुभेच्छा देवून मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे** | **प्राचार्य डॉ. रा. ना. शेंडगे** |
| **सचिव, अधिसभा** | **अध्यक्ष, अधिसभा** |

**जोडपत्र "अ"**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## प्रश्नोत्तरे

**अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व त्यावर विद्यापीठ प्रशासनाने तयार केलेली उत्तरे**

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **डॉ. सी. एस. चव्हाण** | **प्राचार्य श्री. एस. के. पवार** |
| १) | आपल्या विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्ण पदक दिले जाते काय? | नाही. |
| | • दिले जात नसल्यास का दिले जात नाही ? | सुवर्णपदक देण्यासाठी आजपर्यंत कोणीही देणगीदार पुढे आलेले नाहीत. |
| | • सुवर्णपदक देण्यास केव्हा सुरुवात केली जाणार ? | योग्य देणगीदार पुढे आल्यानंतर. |
| | • सुवर्णपदकाऐवजी गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना लागू करण्याचा विचार आहे का? आणि त्यासाठी निधी निर्माण करायची विद्यापीठाची इच्छा आहे का? | विद्यापीठ स्तरावर चर्चा होवून निर्णय घेण्यात येईल. |
| | • विद्यापीठ परीक्षेमध्ये सुवर्णपदक देण्यासाठी देणगीदार मिळविण्यासाठी काही प्रयत्न केले आहेत का ? | विद्यापीठाच्या कोणत्याही अधिका-याने अशा निधी मिळविण्याच्या योजनेत सामील होणे तांत्रिकदृष्ट्या कठीण बाब आहे. त्यामुळे विद्यापीठाने अधिका-यामार्फत अशा प्रकारची कोणतीही मोहीम राबविली नाही. |
| | • सुवर्णपदकासाठी येणारा खर्च विकास फंडातून करता येण्यासारखा नाही का ? | चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. |
| | • विद्यापीठास देणगी मिळाली तरच सुवर्णपदक द्यावे असा नियम आहे का ? | विद्यापीठाने सुवर्णपदक दयावे असा नियम नाही. देणगी मिळाली नाही तर काय होईल, याचा प्रश्न उद्भवत नाही. |
| | • चालू अंदाजपत्रकानुसार सुवर्णपदकासाठीच्या खर्चाची तरतूद आहे काय? | नाही. |
| | • Is any amount fixed for the Gold Medal? | No |
| | • सुवर्णपदक दिल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. सुवर्णपदकाऐवजी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळण्यासाठी आपण कोणती कार्यवाही केली आहे? | ९ वेगवेगळ्या प्रकारची बक्षीसे देणगीदारांनी दिलेल्या देणगीतून देण्यात येतात. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २) | महाराष्ट्र शासनाच्या सुधारित कायद्यानुसार BoS चा सदस्य म्हणून नेमणूक होण्यास Ph.D. ही प्रमुख अर्हता आहे काय? | होय |
| | असल्यास समाजकार्य विभागातील एकमेव Ph.D. धारक प्राध्यापिका डॉ. निशा वाघमारे यांची BoS सदस्यपदी-अध्यक्षपदी निवड का झालेली नाही ? | समाजकार्य हे स्थायी अभ्यासमंडळ नसून अस्थयी अभ्यासमंडळ आहे. |
| | एखाद्या अभ्यासमंडळात (स्वीकृत) जर Ph.D. धारक प्राध्यापक उपलब्ध असेल तर त्या अभ्यासमंडळाचा अध्यक्ष विना Ph.D. धारक प्राध्यापकास करता येते काय? | नाही |
| | • BoS अध्यक्ष होण्यासाठी कोणत्या पात्रता आहेत ? | महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१४ सप्टेंबर २००९ मध्ये तरतूद दिलेली आहे. |
| | • समाजकार्य विभागाचे सध्याचे BoS चेअरमन कोण आहेत? ते सर्व पात्रता पूर्ण करतात का? अस्थाई अभ्यासमंडळाच्या तरतूदी काय आहेत? | समाजकार्य विभागाचे Ad-voc BoS आहे व त्याचे चेअरमन सर्व पात्रता पूर्ण करतात. Ad-hoc Board chairman साठी शासनाने कोणत्याही पात्रता दिलेल्या नाही. परिनियम ५०४ नुसार अस्थाई अभ्यासमंडळाची तरतूद असून, अस्थाई अभ्यासमंडळ विद्यापरिषदेतून गठीत करण्यात येते व अस्थाई अभ्यासमंडळाच्या सदस्यांतून अध्यक्ष्याची निवड केली जाते. त्यामुळे ते नियमात बसतात. |
| ३) | विद्यापीठातील प्रश्नपत्रिकांचे स्वरूप, उत्तरपत्रिका किती तपासाव्यात? त्याचे मानधन किती असावे इ. ठरविण्यासाठी पूर्वीच्या अधिसभेत ठरल्याप्रमाणे समिती नियुक्त केली होती काय ? | अधिसभेत सदर समिती नियुक्त करण्याचे ठरलेले नाही. |
| | केली असल्यास समितीने त्यासंबधी कोणता निर्णय घेतला ? | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | • मागील सभेत परीक्षा मंडळापुढे हा विषय ठेवून निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले होते त्याचे काय ? | BoE च्या दि.०३/०३/२०११ रोजी झालेल्या सभेमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.<br>५० गुणांसाठी ५० ते ८० उत्तरपत्रिका तपासण्याचे निश्चित करण्यात आले.<br>१०० गुणंसाठी ४० ते ६० उत्तरपत्रिका तपासण्याचे निश्चित करण्यात आले. |
| | • कॅप सेंटरला निर्णय कळविला आहे का? | नाही. योग्य त्या मान्यता झाल्यानंतर कळविण्यात येईल. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● २००५-१० या कालावधीत अधिसभा नव्हती ? | पहिल्या अधिसभेमध्ये झालेल्या चर्चेनुसारच उत्तर दिले आहे. |
| | **डॉ. यु. व्ही. भोसले** | **श्री. बी. आर. गायकवाड** |
| ४) | सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकाची मुदत (कालावधी) किती वर्षासाठी असते? | प्रतिनियुक्तीवरील समन्वयकाची मुदत ३ वर्षासाठी असते. |
| | ● समन्वयकाची मुदत ठरवीत असतांना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरचे परिनियम व अध्यादेश लागू आहेत का? | समन्वयकासारखी पदे भरताना शासनाकडून स्वतंत्र GR काढून शासनाकडून स्वतंत्रपणे मंजूर करावी लागतात याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. ती मंजूरी आल्यानंतरच प्रतिनियुक्ती करता येईल. |
| | ● विद्यापीठाला पाच वर्षे होवूनही पूर्ण वेळ समन्वयक का नाही? त्यासाठी विद्यापीठाने काय प्रयत्न केले? | शासनाकडून हे पद मंजूर नाही. ज्यावेळेला शासनाकडून पद मंजूर होईल तेव्हा ते पूर्णवेळ पद भरण्यात येईल. |
| | ● राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकास आजपर्यंत दोन वेळा मुदत वाढ दिली ? आणखी किती वेळा मुदतवाढ देणार आहात? | शासनाकडून पद मंजूर होईपर्यंत मुदतवाढ द्यावी लागेल. |
| | ● इतर पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत का? माहिती गोळा केली आहे काय? | अतिरिक्त काम करण्याचे समन्वयकाने कबूल केल्याने मानधनावर नियुक्त केले आहे. विद्यापीठाच्या सुरुवातीला उपलब्ध असलेल्यांना संधी देण्यात आली आहे. समन्वयकाचे काम समाधानकारक आहे. महाराष्ट्र शासनाकडून विद्यापीठास व त्यांना स्वतःलाही राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार मिळाला आहे. |
| | **डॉ. डी. आर. बाड** | **श्री. बी. आर. गायकवाड** |
| ५) | राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे विद्यापीठात महाविद्यालयनिहाय घेण्यात आली. त्याचे खर्चाचे चेक संबंधित महाविद्यालयाकडून संबंधित कॉन्ट्रॅक्टरच्या / केटरर्सच्या नावे Bearer पध्दतीने घेतले. खरे आहे काय? | माहिती मागविण्यात आली आहे. बरेचसे Cheque A/c Payee दिलेले आहेत. |
| | ● ब-याच महाविद्यालयाकडून Bearer Cheque घेतलेले आहे. तेही केटरर्सच्या नांवे घेतले आहे. ज्या महाविद्यालयातील १०० विद्यार्थी मंजूर आहेत परंतु प्रत्यक्षात ३० ते ४० उपस्थित होते. त्यांचे सुद्धा पूर्ण रकमेचे चेक कसे खर्ची टाकले? | ज्या महाविद्यालयांचे जितके विद्यार्थी शिबिराला गेले त्यांचेच Cheque संबंधितांना आदा केले आहेत. ते बरेचसे A/c Payee दिलेले आहेत. Bearer Cheque दिले किंवा कसे याची माहिती मागविली आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | • सदर शिबिरात किती विद्यार्थी आले ? | माहिती मागवावी लागेल. याबाबत ज्या त्या महाविद्यालयाचे प्राचार्य त्यानुसार खर्च करतील व त्याची माहिती विद्यापीठास पाठवतील. |
| | • विद्यार्थी किती आले याची नोंद प्राचार्यांकडे कशी काय असणार? | महाविद्यालयाचे Programme Officer शिबिरास उपस्थित असल्याने त्यांच्याकडे माहिती आहे. |
| | • प्राचार्यांकडून परस्पर चेक घेणे व केटरर्सला देणे ही पध्दत बरोबर आहे का? | विद्यापीठाच्या आवारात शिबीर होणे म्हणजे विद्यापीठानेच पैसे देणे असे नाही. ते ज्या महाविद्यालयाचे विद्यार्थी त्यांनीच ते केटरर्सला द्यावेत. |
| | • मग सदरसाठीचे चेक विद्यापीठाने महाविद्यालयास का दिले? | राष्ट्रीय सेवा योजनेचे पैसे विद्यापीठाने कॉलेजला देणे जरुरी आहे व जेथे कॅम्प होतो तेथे संबंधित महाविद्यालयास चेक द्यावे. |
| | • विद्यापीठाकडे माहिती असताना प्राचार्यांकडून माहिती का मागविता? | सभागृहात आता माहिती नाही. सदरची माहिती विभागात आहे. |
| | • अधिसभेने जर एखादा प्रश्न विचारला व ती माहिती कॉलेजकडून यावी असा संकेत देण्यात येतो का? माहिती वेळेत आली नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येते का? | अनुदान दिलेले ४८ महाविद्यालये आहेत. यापैकी १९ महाविद्यालयांकडून माहिती मिळालेली आहे. यामध्ये A/c Payee Cheque १६ महाविद्यालयांनी व Bearer Cheque ३ महाविद्यालयांनी दिलेले आहेत. संबंधित महाविद्यालयास प्रश्न प्राप्त झाल्यानंतर लगेचच कळविण्यात येते. महाविद्यालयांनी सदरची माहिती दिली नाही तर त्यांच्यावर कार्यवाही करण्याकरीता प्राधिकरणाने निर्णय घेणे गरजेचे आहे. |
| | **डॉ. व्ही. एच. निंबाळकर** | **श्री. बी. आर. गायकवाड** |
| ६) | सोलापूर विद्यापीठाचे स्पोर्टस् कोऑर्डिनेटर यांची मुदत केव्हा संपली? | मुदत लागू होत नाही. |
| | मुदतवाढ दिली असल्यास नियमाप्रमाणे प्रक्रिया करुन दिली आहे काय? | सोलापूर विद्यापीठाचे स्पोर्टस् कोऑर्डिनेटर प्रतिनियुक्तीवरील नसून अधिकचा कार्यभार म्हणून मानधनावर नियुक्ती असल्याने मुदतीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | कायदा/परिनियमाच्या कोणत्या कलमान्वये मुदतवाढ देण्यात आली. | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | • स्पोर्टस् को-ऑर्डिनेटर स्पोर्टशी संबंधित आहेत का? | होय. |
| | • स्पोर्टस्‌शी संबंधित इतर पात्र उमेदवार असतांना त्यांचीच का निवड केली जाते? इतरांची निवड का केली नाही? | त्यांचे काम समाधानकारक आहे. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● स्पोर्टस् को-ऑर्डिनेटर यांची तदर्थ शिक्षक म्हणून नेमणूक होती काय? | संबंधित महाविद्यालयाकडून माहिती घेण्यात येईल. |
| | ● प्रतिनियुक्ती म्हणजे काय? | महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ व परिनियमामध्ये प्रतिनियुक्तीची व्याख्या दिलेली नाही. तेव्हा प्रतिनियुक्ती म्हणजे काय यासंबंधी MCSR पाहून माहिती घेवू. |
| | **<u>डॉ. एम. टी. बचुटे</u>** | **<u>प्राचार्य डॉ. के. एन. गणगे</u>** |
| **७)** | सोलापूर विद्यापीठाचे परिनियम तयार करण्यासाठी समिती नेमली आहे काय? | होय. |
| | या समितीत कोणते सदस्य आहेत? | १. डॉ. लोणीकर एस. व्ही. अध्यक्ष<br>२. प्राचार्य डॉ. गणगे के. एन. सदस्य<br>३. श्री. सलगर बी. एस. सदस्य<br>४. श्री. गायकवाड बी. आर. सदस्य<br>५. प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. सदस्य |
| | समिती गठीत केली नसल्यास नवीन समिती स्थापन करणार आहात काय? | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| | ● २००५ ते १० या काळात परिनियमासाठी समिती गठीत केली होती काय? परिनियमासाठी समितीच्या किती वेळा बैठका झाल्या? | समिती गठीत केली होती. समितीच्या ४ बैठका झाल्या. Common Statutes करण्यासाठी शासनाने समिती नेमली. शासन स्तरावर निर्णय होणार आहे. राज्यपातळीवर कार्यवाही होणे अपेक्षित होते. |
| | ● समितीला कार्यकाळ निश्चित केलेला आहे काय? | नाही. Statute (परिनियम) समिती शिवाजी विद्यापीठाचे परिनियम वापरत आहेत. पुढे पुढे परिनियम जसे वापरात येतील त्या-त्या पध्दतीने परिनियम बदलाची किंवा नवीन करण्याची गरज भासते. ज्या प्राधिकरणातून सदस्य आलेले असतात त्यांची मुदत संपली की नवीन सदस्य घेण्यात येतात. Ongoing Process आहे. |
| | ● कार्यकाळ निश्चित नसेल तर परिनियम केव्हा तयार होतील? | लवकरच तयार होतील. |
| | ● समितीला मुदत का दिली नाही? | परिनियम करण्यासाठी बहुतांशी कालावधी लागेल म्हणून कार्यकाळ ठरविला नाही. परिनियम बदलाची / नवीन करण्याची कार्यवाही सतत चालू असते. त्यामुळे समिती सदस्यांची ते ज्या प्राधिकरणातून आलेले आहेत त्या प्राधिकरणाची मुदत संपेपर्यंत त्यांची परिनियम समितीवर मुदत राहील. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | **डॉ. एस. पी. गायकवाड** | **प्राचार्य डॉ. के. एन. गणगे** |
| ८) | कॅप सेंटरसाठी विजेचे बिल किंवा जनरेटरचा खर्च देण्याबाबत विद्यापीठाची भूमिका काय आहे? | यापूर्वीच १२५/- रुपये प्रतिदिन इतक्या खर्चास विद्यापीठाने मान्यता दिली आहे. |
| | • कॅप सेंटरला मान्य केलेला १२५/- रुपये खर्च यापेक्षा जास्त खर्च आला तर मान्य करण्यात येईल का? | याचा BoE विचार करेल. |
| ९) | अविष्कार मेळाव्याचा जमाखर्च मंजूर करुन घेतला आहे का? | होय. |
| | असल्यास जमाखर्चाचा तपशिल द्यावा. | सोबत जमा खर्चाचा तपशील जोडला आहे. |
| | • Prizes & Memento खर्चाचा तपशील पहायला मिळेल का? | सविस्तर तपशील कार्यालयात उपलब्ध आहे. |
| | • अविष्कारमध्ये Lodging, Boarding, Accommodation यांचे वेगळे हेड का दाखविले? | विद्यार्थ्यांचा व त्यांच्यासोबत आलेल्या पदाधिकारी यांचा खर्च वेगळा दाखविला आहे. यास्तव वेगवेगळे हेड दाखविले आहे. |
| | • Corpus fund बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही केली का? | Corpus fund बाबत राजभवनातून समिती नियुक्त करण्यात येते. ही समिती खर्च करण्याबाबत कुठल्या हेड खाली किती खर्च करता येतो. Corpus fund मध्ये जेवढा निधी जमा होईल त्याच्या निम्मा निधी Corpus fund मध्ये ठेवावा लागतो व त्याच्या व्याजातून नियतकालिक छापण्यात येते. |
| | **डॉ. बी. एस. बिराजदार** | **डॉ. टी. एन. शिळीमकर** |
| १०) | महाराष्ट्र शासनाच्या विद्यापीठ कायद्यानुसार अभ्यासमंडळाच्या चेअरमन पदासाठी पीएच.डी. ही अट बंधनकारक आहे काय? | होय. |
| | पीएच.डी. धारक सदस्य अभ्यासमंडळात असताना पीएच.डी. नसलेल्यांना अभ्यासमंडळाचे चेअरमन होता येते का? | नाही. |
| | पीएच.डी. धारक पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांस अभ्यासमंडळाचा अध्यक्ष होता येते काय? | नाही. |
| | • जर एखाद्या मंडळाचा अध्यक्ष आपणाकडे Ph.D. करीता नोंदणीकृत असेल तर याबाबत माहिती घेतली आहे का? | नाही. |

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| | ● Ph.D. च्या एखाद्या विद्यार्थ्याला अस्थाई अभ्यासमंडळ अध्यक्ष होता येत नाही असा कुठला नियम आहे काय? | कोणताही नाही. |
| | ● २००५-१० या कालावधीत अनेक प्राधिकरणाचे अध्यक्ष, Dean, MC Member Ph.D. ला होते. तेव्हा असा प्रश्न उद्‌भवतो का? | नाही. |
| ११) | विद्यापीठात भाषा संकुल होण्यासाठी शासन स्तरावर काय प्रयत्न केले आहेत? | नाही. |
| | भाषा संकुलासाठी कोणत्या विषयांसाठी प्रस्ताव आहेत. | सध्या कोणत्याही नाही. |
| | त्या संदर्भातील सद्यस्थिती काय? | प्रस्ताव समितीची स्थापना करण्यात आली आहे. |
| | **श्रीमती डॉ. एम. एस. कदम** | **प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे** |
| १२) | किती महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान मंडळाकडे संस्थेने 2F व 12B खाली संलग्नीकरण घेतले आहे? | विद्यापीठ अनुदान मंडळाकडून २९ महाविद्यालयांना 12B ची मान्यता आहे. |

सही/-
सचिव अधिसभा
(कुलसचिव)